# प्रिय शुभार्थींच्या शुभंकरा

सौ. अंजली महाजन

शुभार्थींच्या शुभंकरा
तू खुषीत रहा, हसत रहा ।
या हास्यातूनी दोघांचेही
जीवन तू फुलवीत रहा ।।ध्रु.।।

प्रत्येकाचे नशीब म्हणजे
असते ईश्वरी देणे ।
काय त्याचा मतीतार्थ
तो जाणूनी घेणे ।
भय, चिंता आणि निराशा
यांचे सावट असते जीवघेणे ।
त्या वेळी सुहास्य हाच उपाय
तू करूनी पाहा ।।१।।

जीवनामध्ये जेव्हा जेव्हा मागूती
वळूनी तू पाहशील ।
सुखाचे डोंगर तेव्हा
दूर दूर गेले असतील ।।
अनेक बरेवाईट प्रसंग
कदाचित पुढे येऊन ठाकतील ।
याचा मनी खेद न मानता
तू सदैव धैर्यशील रहा ।।२।।

विघ्ने आणि दु:खे
जरी मार्गात येतील पदोपदी ।
याची खंत वाटू देऊ नकोस
तू तुझ्या जीवनी ।।
शुभार्थींच्या भावना
नित घे तू समजावूनी ।
अशा वेळी तुझ्या ठायी
ठेव तू सुंदर प्रसन्नता ।।३।।

आजाराचे भय अन् चिंता
पाठवून दे देशांतरी ।।
भयंकर असला जरी
तो रिपू मात कर तयावरी ।।
तू तुझ्या शुभार्थींसह
राज्य कर जगावरी ।
सुखी जीवनाची स्वप्ने
तू दिवस रात्र सतत पाहा ।।४।।

समर्पण येत असते
आपुल्या आंतरिक ओढीतून ।
कधी येते ते संथ
तर कधी खळाळत ओसंडून ।।
जीवनात जाऊ नकोस
कधी तू भांबावून ।
आपुल्या त्यागाचा
एक टप्पा अटळ आहे खरा ।।५।।

●●●